औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.

औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाची गुरुवार दि. २९. ८. १९९१ रोजी झालेल्या ६५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

सभेस खालील पदाधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १] मा. श्री. ईश्वर भोसीकर | सभापती/औरंगाबाद मंडळ. |
| २] श्री. अरविंद महाजन | उपसभापती/औरंगाबाद मंडळ. |
| ३] श्री. व. श. राजभोज, कार्यकारी अभियंता, आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी. | सदस्य |

विषय क्र. १:- दिनांक २९. ७. ९१ रोजी झालेल्या ६४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे.

दिनांक २९. ७. ९१ रोजी झालेल्या मंडळाच्या ६४ व्या बैठकीत श्री. दे. हि. मुन, उपसंचालक, नगर रचना, औरंगाबाद विभाग यांनी तुळजापूर येथील मंडळाच्या जमिनीवर नगरपरिषद तुळजापूरचे [व्यापारी संकुलाचे ] आरक्षण आहे व ती जमिन नगरपरिषदेस द्यावी असा प्रस्ताव त्यांनी मांडला होता. त्या अनुषंगाने उपसभापती यांनी मंडळास सांगितले की, नगरपरिषद तुळजापूर यांच्याकडून जागा मागणीबाबत पत्र आले नाही.

परंतू सदर जमिनीची प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वानुसार किंमत काढून ठेवावी.

ठराव क्र. ३८५.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने दिनांक २९. ७. १९९१ रोजी झालेल्या ६४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यात आला.

विषय क्र. २:- अमृतधाम नासिक येथील विडी कामगारासाठी बांधलेल्या ४४७ गाळयांच्या योजनेस पाणीपुरवठा करणे बाबत.

आणि

विषय क्र. ३:- मौजे दसक नासिक येथील स. नं. २०/१ येथे विकसित केलेल्या ४७ अत्यल्प उत्पन्न गट व १४ अल्प उत्पन्न गटातील भूखंडाच्या योजनेच्या अभिन्यासास मान्यता मिळणेबाबत.

ठराव क्र. ३८६.

चर्चेअंती मंडळाने असा निर्णय घेतला की, विषय क्र. २ व विषय क्र. ३ हे नासिक विभागाशी संबंधीत असल्याने नासिक येथे सप्टेंबर १९९१ मध्ये होणा-या मंडळाच्या नासिक येथील बैठकीत ठेवण्यांत यावे.

विषय:- क्र. ४: सातपूर नासिक येथील ३५ उच्च उत्पन्न गट योजनेतील आरक्षणात बदल करणेबाबत.

ठराव क्र. ३८७.

या विषयावर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, सातपूर नासिक येथील उच्च उत्पन्न गटातील गाळयासाठी दिलेल्या ९३ गाळयांच्या जाहीरातीनुसार प्राप्त झालेल्या अर्जाची प्रत्यक्ष बांधकामासाठी घेतलेल्या ३५ गाळयांच्या प्रमाणात आरक्षणामध्ये बदल करावा. तसेच गाळयांची कमी झालेली संख्या व आकारावी लागणारी किंमत याबाबत अर्जदारांना पत्र पाठवून त्यांची सम्मती घ्यावी.

विषय क्र. ५:- मालेगांव नगरपालिकेकडून आलेल्या रौनकाबाद या झोपडपट्टीतील सुधारणा कामाच्या प्रस्तावास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे बाबत.

ठराव क्र. ३८८.

या विषयावर चर्चा करतांना असा निर्णय घेतला की, मालेगांव नगरपरिषदेकडून खालील मुद्याबाबत माहिती मागवावी व त्यांच्याकडून समाधानकारक माहिती प्राप्त झाल्यावरच रौनकाबाद या झोपडपट्टी सुधारणा प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता द्यावी.

१] रौनकाबाद झोपडपट्टीची लोकसंख्या वाढली आहे, त्याबाबत समाधानकारक पुरावा.

२] रौनकाबाद झोपडपट्टीची हद्द वाढली आहे का ?

३] रौनकाबाद झोपडपट्टी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात घोषित झाली आहे का ? असल्यास राजपत्राची प्रत सादर करावी.

विषय क्र. ६:- मा. सभापतीच्या परवानगीने आयत्यावेळेस येणारे विषय.

विषय क्र. १:- रे. दि. दावा क्र. ५०५/९१ सखाराम हरीभाऊ वावर.

विरुध्द

रामचंद्र चव्हाण व इतर.

ठराव क्र. ३८९.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, श्री. सखाराम हरीभाऊ वावर यांनी रे. दि. दावा क्र. ५०५/९१ विरुध्द श्री. रामचंद्र चव्हाण, मिळकत व्यवस्थापक, न्यायालयात दाखल केले आहे. श्री. चव्हाण यांनी गाळा क्र. ७०४ व त्या भोवतालची जागा, या अनुषंगाने जो कांही पत्रव्यवहार, आदेश दिले ते केवळ कार्यालयीन कार्यक्षेत्रच असल्याने त्यांना मंडळातर्फे वकील देऊन त्यांच्यातर्फे बचाव करावा.

[२] न्यायालयाने दिनांक २९. ८. १९९१ रोजी उपस्थित राहण्याचे समन्स बजावले असल्याने कार्यालयाने मंडळाचे वकीलास मिळकत व्यवस्थापक, श्री. चव्हाण यांच्यातर्फे न्यायालयात उपस्थित राहून बचाव करण्यास विनंती केली.

वरील परिस्थितीत कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी मंडळ प्रदान करीत आहे.

विषय क्र. २:- नासिक येथील चुंचाळे क्षेत्रातील गट क्र. १०७, १०१/२ आणि ९९ हया जमिन मालकांनी देऊ केलेल्या ६०% जमिन लवकर उपलब्ध होण्यासाठी शासनास विनंती करणेबाबत.

ठराव क्र. ३९०.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की, चुंचाळे नासिक येथील गट क्र. १०७, १०१/२ आणि ९९ या जमिनी मंडळाच्या संपादन प्रक्रियेत आहेत. जमिनीचे मालक ६०% जमिन देण्यास तयार असल्यामुळे ही जमिन देण्यात यावी व त्यांच्या प्रस्तावात दाखविलेली ४०% टक्के जमिन, जमिन मालकांना द्यावी या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनास विनंती करावी व आवश्यक ती कार्यवाही करावी.

मा. सभापतीचे आभार मानुन सभा संपली.

गा/२९९१.